पशुसंगोपन

# दुग्धोत्पादन कमी होण्याची कारणे आणि त्यावरील उपाय



**डॉ. शिल्पा साळुंके (मोडेकर)**
सहायक प्राध्यापक,
क्रांतिसिंह नानासाहेब पाटील
पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ,
जि. सातारा



जगाच्या तुलनेत भारतात पशुधनाची संख्या सर्वाधिक आहे. त्यामुळेच आपण दुग्धोत्पादनात अग्रेसर ठरतो; पण हे अगदीच समाधान मानण्यासारखे मुळीच नाही! याचे कारण म्हणजे प्रति जनावर दूध उत्पादनाचे प्रमाण लक्षात घेता, ते अतिशय कमी आहे. म्हणजेच आपल्या देशात एकूण दूध उत्पादन बरेच असले तरी वाढत जाणाऱ्या लोकसंख्येकरिता पुरेसे दूध उपलब्ध नाही. यात गायीपासून मिळणारे दुधाचे उत्पादन कमी प्रमाणात आहे. यासाठीच पशुधनाचे योग्य व्यवस्थापन आवश्यक आहे.

भारत हा कृषिप्रधान देश आहे हे आपण गौरवाने सांगत आलो आहोत आणि हे खरे देखील आहे. मात्र असे असले तरीही; आपल्या महाराष्ट्र राज्यापुरता विचार करायचा झाल्यास, आपल्या राज्यातील ५०% पेक्षा अधिक लोकसंख्या कृषिक्षेत्राशी निगडित असूनही, कृषिक्षेत्राचा वाटा सकल राष्ट्रीय उत्पादनात फक्त १०.५% आहे. शेतीपूरक व्यवसाय आणि उत्तम जोडधंदा म्हणून पशुपालनाकडे पाहिले जाते. वर्षानुवर्षे ही परंपरा कायम आहे. जगाच्या तुलनेत भारतात पशुधनाची संख्या सर्वाधिक आहे. त्यामुळेच आपण दुग्धोत्पादनात अग्रेसर ठरतो; पण हे अगदीच समाधान मानण्यासारखे मुळीच नाही! याचे कारण म्हणजे प्रति जनावर दूध उत्पादनाचे प्रमाण लक्षात घेता, ते अतिशय कमी आहे. म्हणजेच आपल्या देशात एकूण दूध उत्पादन बरेच असले तरी वाढत जाणाऱ्या लोकसंख्येकरिता पुरेसे दूध उपलब्ध नाही. यात गायीपासून मिळणारे दुधाचे उत्पादन कमी प्रमाणात आहे. यासाठीच पशुधनाचे योग्य व्यवस्थापन आवश्यक आहे.

### अनुत्पादक गुरांची वाढती संख्या

आपल्या देशात, इतर देशांच्या तुलनेत गायी आणि म्हशी प्रचंड संख्येत असल्या, तरी उत्पादन क्षमता कमी झालेली गुरे बरीच आहेत. यासाठी ज्या काही गोष्टी कारणीभूत आहेत, त्यात दैनंदिन व्यवस्थापन तर आहेच पण प्रामुख्याने पुरेशा प्रमाणात चारा उपलब्ध नसणे, चाऱ्याचे योग्य नियोजन नसणे ही बाबही आहे. या गोष्टीचा थेट परिणाम गुरांच्या वाढीवर होऊन उत्पादन क्षमता घटते. म्हणूनच ऋतुमानाप्रमाणे चाऱ्याचे व्यवस्थापन करून आपल्या गुरांच्या वाढीवर आणि उत्पादन क्षमतेवर परिणामकारक ठरणारे नियोजन करणे गरजेचे आहे.

### विविध रोग व आजारांचे निर्मूलन

योग्य वेळी, योग्य वयात ठराविक रोगांच्या प्रादुर्भावास जनावरे बळी पडत असतात. ऋतुमानातील बदल किंवा संपर्कातील इतर जनावरांस झालेल्या रोगांच्या संसर्गाने इतर





जनावरांस धोका संभवू शकतो. बऱ्याचदा काही रोग हे फक्त उत्पादन क्षमताच कमी करत नाहीत तर आपले जनावर त्या रोगामुळे मृत्युमुखी देखील पडू शकते. म्हणूनच वेळोवेळी तज्ज्ञांच्या सल्ल्याने विविध रोगप्रतिबंधक लसीकरण जनावरास करणे हे भविष्यातील हानी कमी करण्यासाठी फायद्याचे ठरू शकते. नियमितपणे जंतनिर्मूलन करणे, परजीवींपासून बचाव करणे, योग्य आणि नियोजनबद्ध लसीकरण हे गुरांच्या उत्पादन क्षमतेवर थेट अनुकूल परिणाम करणारे ठरते.

### चाऱ्याची योग्य रीतीने साठवण करणे

वर्षभरासाठी आपल्या गुरांसाठी चाऱ्याची व्यवस्था गोपालक कायम करत असतो. यात प्रामुख्याने कडबा, भुसा इत्यादी खाद्यांचे पावसात ओले होण्यापासून रक्षण करणे गरजेचे असते. उन्हाळ्यात हिरव्या चाऱ्याचा तुटवडा कायमच भासत असतो. म्हणून सायलेज करून ठेवणे फायद्याचे ठरू शकते. अशाप्रकारे योग्य चारा व्यवस्थापन करणे खूप गरजेचे आहे. आहार व्यवस्थापनात खनिज, प्रथिनयुक्त असा योग्य मेळ असणे गरजेचे आहे. चाऱ्याच्या योग्य व्यवस्थापनातून आपण परवडू शकणारा दूध व्यवसाय करू शकतो. म्हणूनच चाऱ्याच्या गुणवत्तेकडे लक्ष द्यावयास हवे. दुभत्या गायी म्हशींना लागणारे एकूण खाद्य, चारा आणि त्यातील प्रथिने, ऊर्जा व चांगले पचन होण्याकरिता लागणारे तंतुमय पदार्थ किंवा फायबरचा योग्य समावेश हवा. तज्ज्ञांच्या सल्ल्याने नियोजन केलं जाऊ शकतं.

### आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर करणे

व्यवस्थापनातील आधुनिकीकरण व्यवस्थित राबविल्यास, त्यावरील खर्चाच्या तुलनेत ते निश्चित उपयोगाचे ठरते. गोठ्याचे योग्य आणि तज्ज्ञांच्या सल्ल्याने बांधकाम, जनावराच्या शरीरावरील आणि मनावरील ताण कमी करण्यासाठी गोठ्यात स्प्रे कुलिंग, ग्रुमिंग ब्रश, दूध आणि शेण/ मूत्र काढण्यासाठीचे आधुनिक यंत्र यांचे नियोजन खूप

गरजेचे ठरते. प्रमाणबद्ध आहार, जनावरांची दैनंदिन नोंदवही, कासेची काळजी, गायी आणि म्हशींची माजावर येण्याची वेळ आणि त्याप्रमाणे त्यांना कृत्रिम रेतन किंवा सिद्ध वळूकडून भरवून घेणे ही आजच्या काळाची नितांत गरज झाली आहे. याखेरीज सिद्ध वळूपासून अतिशीत वीर्य तयार करून, त्याचा उपयोग कृत्रिम रेतनाद्वारे जास्तीत जास्त गायी/म्हशींना भरवून घेण्यासाठी केला जाऊ शकतो. याद्वारे जन्मणारे वासरू हे चांगल्या प्रतीची उत्पादन क्षमता असणारे जन्मास येईल. अशाच प्रकारे, उच्च उत्पादनक्षम गायींपासून भ्रूणरोपण तंत्रज्ञानाचा वापर करून देखील उत्तम गुरे निर्माण



करता येतील. याखेरीज स्थानिक, मिश्र जातींच्या जनावरांमध्ये सुधारणा घडवून त्या भागातील चांगल्या प्रतीच्या जनावरांबरोबर त्यांची पातळी आणणे गरजेचे झाले आहे.

### योग्य गायीम्हशींची/ जनावरांची निवड

पशुपालनाच्या यशाचे गमक ठरविणारी पहिली पायरी म्हणजे योग्य जनावराची निवड करणे. यावरच भविष्यातील आर्थिक फायदा अवलंबून असतो. म्हणूनच, दुधाळ, शेतीकामाकरिता उपयुक्त, निरोगी, सुदृढ आणि स्थानिक हवामानात तग धरणाऱ्या जनावरांचीच निवड करणे गरजेचे आहे. त्याकरिता संकरित गुरे निर्मितीच्या कार्यक्रमादरम्यान भारतीय जातींच्या उत्पादन क्षमतेत सुधारणा करणे खूप गरजेचे आहे. याचे कारण म्हणजेच भारतीय गुरे आपल्याकडील हवामानाशी समतोल राखू शकतात. आपल्याकडील ऋतुचक्रातील बदलांमध्ये आपली देशी वंशावळ चांगल्या प्रकारे तग धरू शकते. याकरिता दीर्घकाळ वळूपरीक्षण कार्यक्रम (प्रो जेनिटेस्टिंग प्रोग्रॅम) सातत्याने राबवणे आवश्यक आहे. दीर्घकाळ जर हा कार्यक्रम राबवला गेला तर उत्तम प्रतीच्या वळूचे उत्पादन घेता येईल आणि या वळूंचे अतिशीत वीर्य कृत्रिम रेतन पद्धतीद्वारे व्यापक प्रमाणावर वापरून सुधारणा नक्कीच साधता येईल. आपल्या देशात, साहिवाल, हरियाणवी इत्यादी गुरांकरिता हा कार्यक्रम सुरू आहे. भारतातील उच्च प्रतीच्या देशी गायींपासून भ्रूणरोपण तंत्राद्वारे, उत्तम गुरे/ कालवडी निर्माण करता येऊ शकतील.

### भाकड गुरांचे व्यवस्थापन आणि निरुपयोगी वळूंचे खच्चीकरण

भाकड गुरांमुळे आर्थिक तोटा होतो. त्यांच्या पालनपोषण, आहारावर अनाठायी खर्च होत असतो. भाकड जनावरे दुभत्या जनावरांपासून वेगळी ठेवावी. भाकड गुरांच्या शेण, मूत्रापासून इतर गोष्टींचे नियोजन केले जाऊ शकते. शेणखत/ बायोगॅस/ गोमूत्र प्रकल्प असे संलग्न छोटे- छोटे उद्योग केले जाऊ शकतात. वळूंपासून होणारे अनियंत्रित आणि निरुपयोगी प्रजनन आटोक्यात आणले जाऊ शकते.

याखेरीज, योग्य गायींची/ कालवडींची निवड करून खरेदी करणे खूप फायदेशीर ठरते. आपल्याकडे जमिनीची उपलब्धता मुबलक आहे. तेव्हा योग्य कृषितज्ज्ञांच्या, कृषी विद्यापीठातील तज्ज्ञ मंडळींच्या सल्ल्याने योग्य ती मिश्रशेती करण्यावर भर द्यावयास हवा. शेतीधंद्याला पूरक असा दुग्धव्यवसाय केल्यास काही पिकांचा कडबा, तूस वैरण म्हणून वापर करता येईल आणि याद्वारे दुग्धोत्पादन वाढवता येईल.

याखेरीज, आपल्याकडे जास्त संख्येने जनावरे सतत चरायला सोडल्याने खेडोपाडी बरीचशी गायराने आणि चराऊ जमिनी ओसाड झाल्या आहेत. तेव्हा जास्त उत्पादन देणाऱ्या गवताचे बी टाकून, त्यांची नीट निगा राखली तर त्याच जमिनीवर आपल्याला मुबलक चारा मिळेल. याचप्रमाणे चक्री चराईची पद्धत अंमलात आणावयास हवी किंबहुना सक्तीची करण्यास काहीच हरकत नाही. अवर्षणप्रवण क्षेत्रामध्ये मारवेल, पवना, डोंगरी गवत याचप्रमाणे सुबाभूळ, अंजन अशा चाऱ्याची आणि झुडुपांची लागवड केली जाऊ शकते.

दुग्धप्रक्रिया उद्योगास चालना देण्यासाठी नियोजन करण्याची नितांत गरज आहे. याद्वारे तरुण पिढी (नोकरी कामाच्या निमित्ताने शहरांकडे न पळता) योग्य प्रशिक्षण आणि मार्गदर्शनातून दुग्धप्रक्रिया उद्योग/ लघुउद्योग नक्कीच उभा करून यशस्वी होऊ शकेल. याखेरीज राज्यातील पशुधनाची घटती संख्या लक्षात घेता आपल्याला पशुधनाचा व्यवस्थित सांभाळ करावयास हवा. पशुपालकांनी योग्य प्रशिक्षण, मार्गदर्शन, जुन्या आणि नवीन तंत्रज्ञानाची जोड देऊन जागरूकतेने पशुपालन करावे. याद्वारे फक्त स्वत:चेच नव्हे तर आपल्या कुटुंबाचे, गावाचे, राज्याचे आणि आपल्या देशाचेही जीवन समृद्ध करावे. ■